पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - स्वप्ने पाहणे ही केवळ सुरुवात आहे, स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७७,३२८.१९ | -५१६.३४ (०.६६%) |
| डॉलर | ₹ ९४.४३ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४५ | २६ |
| दिल्ली | ३९ | २७ |
| मुंबई | ३८ | २८ |
| नागपूर | ४० | २६ |
| पुणे | ४१ | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. ११ मे २०२६ | वर्ष २ रे | अंक १७९ | किंमत : ५ रु. | पाने ४

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-५:५२ | संध्या-६:५७ |

**सोने – चांदी**

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५१,६००/- | २,५४,०००/- |

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# गरज असेल तरच इंधन वापरा

## पश्चिम आशियातील संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे देशवासियांना आवाहन

वृत्तसंस्था । हैदराबाद

**पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. 'आजच्या काळाची गरज ओळखून पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करा', असे आवाहन त्यांनी रविवारी केले. हैदराबाद येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी तेलंगणामध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन केले. यावेळी संबोधित करताना त्यांनी देशातील ऊर्जा सुरक्षेवर भाष्य केले.**

सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असलेल्या 'होर्मुझची सामुद्रधुनी' बंद झाल्याने भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

पंतप्रधान म्हणाले की, 'आपल्याला आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ आवश्यक असेल तेव्हाच करायचा आहे. यामुळे केवळ परकीय चलन वाचणार नाही, तर युद्धाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणामही कमी होईल'.

**पर्यायी ऊर्जेसाठी भारताचे पाऊल**

पंतप्रधानांनी यावेळी भारताच्या वाढत्या ऊर्जा सामर्थ्याचाही उल्लेख केला. भारत आज सौर ऊर्जा निर्मितीत जगात आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने पुढील पावले उचलली आहेत.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या प्रमाणात मोठी वाढ करण्यात आली आहे. उज्ज्वला योजनेद्वारे गॅस कनेक्शन दिल्यानंतर आता स्वस्त पाइप गॅस पुरवठ्यावर भर दिला जात आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि स्वस्त इंधनासाठी सीएनजी जाळ्याचा विस्तार केला जात आहे.



### तेलंगणाला विकासकामांची भेट

**पंतप्रधानांनी या दौऱ्यात अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे लोकार्पण केले. यामध्ये काझीपेट-विजयवाडा रेल्वे मार्ग, हैदराबादमधील नवीन पेट्रोलियम टर्मिनल आणि वारंगल येथील 'पीएम मित्रा पार्क' (काकतिया मेगा टेक्सटाइल पार्क) चा समावेश आहे. सुमारे १,७०० कोटी रुपये खर्चून उभारलेले हे देशातील पहिले पूर्णतः कार्यरत 'पीएम मित्रा पार्क' आहे. केंद्राच्या '५' व्हिजन अंतर्गत हे पार्क कापूस उत्पादक शेतकऱ्यांपासून ते निर्यातीपर्यंतची संपूर्ण साखळी मजबूत करेल, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल. ही काकतिया मेगा टेक्सटाइल पार्कची काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. पंतप्रधानांनी या माध्यमातून केवळ ऊर्जा बचतीचा मंत्र दिला नाही, तर भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी पायाभूत सुविधांचे महत्त्वही अधोरेखित केले.**

# जळगाव महापालिका निवडणुकीतील १६ उमेदवारांवर अपात्रतेची टांगती तलवार

## निवडणूक खर्च निर्धारित मुदतीत सादर नाही केला


प्रतिनिधी । जळगाव

**निवडणूक आयोगाच्या नियमानुसार प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीदरम्यान झालेल्या खर्चाचा संपूर्ण तपशील निश्चित कालावधीत खर्च तपासणी कक्षाकडे सादर करणे बंधनकारक असते. मात्र, जळगाव महापालिका निवडणुकीत अनेक उमेदवारांनी निवडणूक काळात केलेल्या खर्चाचा अहवाल वेळेवर न देता नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे समोर आले आहे. संबंधितांच्या अडचणीत त्यामुळे आता वाढ झाली आहे.**

महापालिका निवडणुकीत एकूण २४ उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा अहवाल निर्धारित मुदतीत सादर केला नव्हता. प्रशासनाने प्राथमिक तपासणीनंतर संबंधित उमेदवारांना नोटीस बजावत अंतिम संधी दिली होती. नोटीसीनंतर आठ उमेदवारांनी आपला खर्चाचा तपशील प्रशासनाकडे (पान २ वर)

**महापालिका निवडणुकीच्या काळात केलेल्या खर्चाचा तपशील न दिल्याने अपात्रतेच्या संभाव्य कारवाईच्या कक्षेत आलेल्या उमेदवारांमध्ये माजी नगरसेविका प्रिया मधुकर जोहरे, वृषाली अर्जुन भारुळे, अनिल रमेशचंद्र पगारिया, मंदा छोटूलाल सोनवणे, कौशल्याबाई उत्तम निकम, पद्माकर देवचंद सोनवणे, कलाबाई नारायण शिरसाठ, छाया फकिरा अडकमोल, चेतन नाना सोनवणे, शेख अहमद नूर लतीफ, जया रघुनाथ साळुंखे, डॉ. किशोर माळी, सोनम रोहिदास सोनवणे आणि अमोल रवींद्र चौधरी यांचा समावेश असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.**

## थोडक्यात



### कसोटी न खेळताही जग जिंकणाऱ्या महान खेळाडूचे निधन

**नवी दिल्ली ।** दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट इतिहासातील एक महान फलंदाज आणि कसोटी क्रिकेट न खेळू शकलेले सर्वोत्तम खेळाडू म्हणून ओळखले जाणारे केविन मॅकेन्झी यांचे वयाच्या ७७व्या वर्षी निधन झाले. गोल्फ कोर्सवर त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि क्रीडा विश्वाने एक महान खेळाडू गमावला. केविन हे दक्षिण आफ्रिकेचे माजी स्टार फलंदाज नील मॅकेन्झी यांचे वडील होते. केविन मॅकेन्झी यांनी त्यांच्या २० वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ट्रान्सवाल संघासाठी १३३ प्रथम श्रेणी सामने खेळले. त्यांनी ३६.५१ च्या सरासरीने ६,७५६ धावा केल्या, ज्यात १३ शतकांचा समावेश होता. ३६ ची सरासरी आजच्या काळात सामान्य वाटू शकते, मात्र ७० आणि ८० च्या दशकात दक्षिण आफ्रिकेतील खेळपट्ट्या पूर्णपणे गोलंदाजांना पोषक असायच्या.

### मंत्री संजीव अरोरांना सलाम!

**नवी दिल्ली ।** भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील पंजाब सरकारमधील मंत्री संजीव अरोरा यांना काल ईडीने अटक केली. या घटनेनंतर आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी प्रतिक्रिया दिली आहे. केजरीवाल यांनी अरोरा यांची प्रशंसा केली आहे. त्यांनी भाजपमध्ये सामील होण्याऐवजी तुरुंगात जाण्याचा पर्याय निवडल्याचे केजरीवाल म्हणाले. ईडीने काल पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांच्याशी संबंधित चार ठिकाणी छापे टाकले. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली आहे. केजरीवाल यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले, संकटाच्या काळात माणसाचे चारित्र्य उघड होते. संजीव अरोरा यांनी भाजपमध्ये सामील होण्याऐवजी तुरुंगात जाण्याचा पर्याय निवडला.

# चाळीसगावच्या मैतर कॉलनीत अज्ञात जमावाची मध्यरात्री भीषण दगडफेक




## घरांसह वाहनांचे मोठे नुकसान; सीसीटीव्हीत कैद झाले हल्लेखोर

प्रतिनिधी । चाळीसगाव

**शहरातील मैतर कॉलनी परिसरात मध्यरात्री अज्ञात जमावाकडून करण्यात आलेल्या अचानक आणि भीषण दगडफेकीच्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात नागरिकांच्या घरांचे तसेच रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, एका राजकीय पदाधिकाऱ्याच्या कार्यालयालाही लक्ष्य करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात तरुणांचा जमाव मैतर कॉलनी परिसरात अचानक दाखल झाला. या जमावाने कोणताही इशारा न देता घरांवर तसेच वाहनांवर दगडफेक सुरू केली. काही मिनिटांतच परिसरात भीतीचे वातावरण पसरले आणि नागरिकांमध्ये गोंधळ निर्माण झाला.या हल्ल्यात अनेक घरांच्या खिडक्या, दरवाजे तसेच वाहनांच्या काचा फुटून मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, या जमावाने एका राजकीय पदाधिकाऱ्याच्या कार्यालयावरही दगडफेक करत तेथेही तोडफोड केल्याचे समोर आले आहे.

या संपूर्ण घटनेचे दृश्य परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये स्पष्टपणे कैद झाले आहे. फुटेजमध्ये काही अज्ञात तरुण हातात दगड घेऊन परिसरात तोडफोड करताना दिसत असून, त्याच आधारावर पोलिसांनी आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू केले आहे. घटनेची माहिती (पान २ वर)

# जळगाव एमआयडीसीमध्ये कंपनीच्या दुसऱ्या मजल्यावरून पडल्याने तरुणाचा मृत्यू

## • नातेवाईकांनी मृत्यूबाबत संशय केला व्यक्त!

प्रतिनिधी । जळगाव


**शहरातील एमआयडीसी परिसरात एका खाजगी कंपनीत काम करणाऱ्या तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. कंपनीच्या दुसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याने गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर नातेवाईकांनी मृत्यूबाबत संशय व्यक्त करत न्याय मिळाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका घेतली आहे.**



दीपक छगन भिल असे मृत तरुणाचे नाव असून, तो एमआयडीसीतील एका खासगी कंपनीत काम करत होता. काम सुरू असताना तो अचानक दुसऱ्या मजल्यावरून खाली पडल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या दीपकला तातडीने जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. तरुणाच्या मृत्यूची माहिती मिळताच नातेवाईकांनी रुग्णालयात गर्दी केली. यावेळी पोलिसांनी आमच्या परवानगीशिवाय आणि माहिती न देता पोस्टमार्टम केल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. पंचनामा आणि पोस्टमार्टम प्रक्रियेदरम्यान आम्हाला कुठलीही माहिती देण्यात आली नाही, असा दावा नातेवाईकांनी केला.मात्र, दीपकचा मृत्यू अपघाती नसून संशयास्पद असल्याचा आरोपही कुटुंबीयांनी यावेळी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.जोपर्यंत दीपकला न्याय मिळत नाही आणि घटनेचा सत्य उघड होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा ठाम पवित्रा नातेवाईकांनी घेतला आहे. त्यामुळे रुग्णालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, मृत्यू नेमका कसा झाला याबाबत चौकशी केली जात आहे.

# रुपाली चाकणकरांची ६ तास एसआयटी चौकशी

वृत्तसंस्था । नाशिक



राज्याला हादरवरुन सोडणाऱ्या नाशिक मधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादीच्या माजी प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांची आज कसून चौकशी करण्यात आली, तब्बल ७ तासापासून डखढ कडून त्यांची चौकशी सुरू होती. त्यामुळे, एसआयटीने रुपाली चाकणकर यांना नेमके काय प्रश्न विचारले, नेमकं कोणत्या प्रकारची चौकशी झाली, याची उत्सुकता सगळ्यांनाच आहे. त्यातच, चाकणकर यांनी एसआयटी पथकापासून बाहेर आल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यापूर्वी, एसआयटीने चाकणकर यांना चौकशीसाठी (पान २ वर)

# पाचोऱ्यात भूसंपादन घोटाळा : ६८ हेक्टर जमिनीसाठी ६३ कोटींचे बोगस प्रस्ताव

## २ वकिलांसह १७ शेतकऱ्यांवर जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यात भूसंपादनाच्या वाढीव मोबदल्यासाठी तब्बल ६३ कोटी रुपयांच्या फसवणुकीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बनावट कागदपत्रे, खोट्या सह्या आणि महसूल विभागाचे बनावट शिक्के वापरून न्यायालयासह शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी दोन वकिलांसह १७ जणांविरुद्ध जळगाव जिल्हापेठ पोलीस ठाण्यात स्वतंत्रपणे १७ गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**




तापी पाटबंधारे विकास महामंडळा मार्फत २०१२ मध्ये पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव बुद्रुक आणि अटलगाव या गावांतील ७२ गटांमधील सुमारे ६८ हेक्टर जमीन लघुपाटबंधारे प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्यात आली होती. त्या वेळी संबंधित शेतकऱ्यांना सुमारे ११ कोटी रुपयांचा मोबदलाही देण्यात आला होता. मात्र, त्यानंतर वाढीव मोबदल्यासाठी न्यायालयात प्रस्ताव सादर करण्यात आले. २०१७ मध्ये आठ आणि २०२५ मध्ये नऊ असे एकूण १७ प्रस्ताव दाखल करण्यात आले.

या प्रस्तावांमध्ये महसूल विभागातील भूसंपादन अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या, खोटे शिक्के आणि बनावट पत्रांचा वापर करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. हे प्रस्ताव अ‍ॅड. किशोर पाटील आणि अ‍ॅड. प्रशांत बाविस्कर यांनी न्यायालयात सादर केल्याचा आरोप आहे. दाखल प्रस्तावांवरून (पान २ वर)

### १७ गुन्हे दाखल होणार

या प्रकरणाची गंभीर दखल घेत संयुक्त दिवाणी न्यायाधीश परदेशी यांनी संबंधितांविरुद्ध महिनाभराच्या आत गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात अ‍ॅड. पाटील आणि अ‍ॅड. बाविस्कर यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांनी ६ मे रोजी जिल्हा न्यायालयाचा आदेश कायम ठेवत याचिका फेटाळून लावली. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केली. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शासनाची प्रत्यक्ष आर्थिक फसवणूक झाली नसली तरी न्यायालयात प्रत्येक अर्ज स्वतंत्रपणे सादर करण्यात आला होता. प्रत्येक अर्जासाठी वेगवेगळे बनावट शिक्के, सह्या आणि कागदपत्रांचा वापर करण्यात आला.

# वंदे मारतरम् आधी तमिळ राज्यगीत वाजवा

## तमिळनाडूमध्ये तमिळ अस्मितेवरून पेटला मोठा वाद

वृत्तसंस्था । चैन्नई

**शासकीय समारंभांच्या शिष्टाचारामध्ये तमिळ थाई वाझथू या तामिळनाडूच्या राज्यगीताला अग्रस्थान दिलं पाहिजे, असं सीपीआयचे राज्य सचिव एम. वीरपांडियन यांनी रविवारी सांगितलं. जोसेफ विजय यांनी आज तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यावेळी सोहळ्याची सुरुवात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने झाली. त्यानंतर जन गण मन हे राष्ट्रगीत वाजवण्यात आले. त्यानंतर तमिळ थाई वाझथू हे गीत वाजवण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे.**



सीपीआय नेते म्हणाले, या आदेशाने तामिळनाडूमधील दीर्घकाळ चालत आलेल्या परंपरेचे उल्लंघन झाले आहे. पारंपरिकरित्या शासकीय कार्यक्रमांची सुरुवात तमिळच्या राज्यगीताने होते आणि समारोप राष्ट्रीय गीताने होतो.

सीपीआय नेत्यांनी नेमकी काय मागणी केली?

राजभवनाने दिलेल्या निर्देशांनुसार, तमिळनाडू सरकारने आयोजित केलेल्या शपथविधी सोहळ्याच्या कार्यक्रम पुत्रिकेत वंदे मातरम गीताला प्राधान्य देण्यात आलं होतं. तर, तमिळ भाषेला तिसऱ्या स्थानी ठेवण्यात आले होते. याबाबत बोलताना सीपीआय नेते म्हणाले, हे प्रस्थापित प्रथेचे उल्लंघन आहे. या चुकीसाठी कोण जबाबदार होते, याचं स्पष्टीकरण तामिळनाडू सरकारने जनतेला दिलं पाहिजे. तमिळगा वेत्री कझगमने तमिळथाई वाझथूला अग्रस्थान मिळेल याची खात्री दिली पाहिजे. अशी चूक पुढे होता कामा नये. तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय आणि हंगामी अध्यक्षांनी हे सुनिश्चित करावं की आमदारांच्या शपथविधीसाठी बोलावण्यात आलेल्या उद्याच्या विधानसभा अधिवेशनात तसंच, सर्व शासकीय कार्यक्रम आणि समारंभांमध्ये सर्वप्रथम तमिळ राज्यगीत वाजवले जाईल आणि समारोपावेळी राष्ट्रगीत वाजवले जाईल, असं वीरपांडियन यांनी पत्रात लिहिलं आहे.

**वीरपांडियन यांनी असाही आरोप केलाय की, या मुद्द्याला ऐतिहासिक आणि वैचारिक पैलू आहेत. ते म्हणाले की स्वातंत्रलढ्या दरम्यान असा निर्णय घेण्यात आला होता की वंदे मारतम हे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले जाऊ शकत नाही, कारण हे गीत एका विशिष्ट देवतेला समर्पित होते आणि त्यात सांप्रदायिक धार्मिक स्वरुप होते.**

# 'समृद्धी'वरून गुटखा तस्करी; तब्बल १.३१ कोटींचा गुटखा, सुगंधित तंबाखू जप्त




वृत्तसंस्था । अकोला

**समृद्धी महामार्गावरून प्रतिबंधित गुटख्याची तस्करी सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.**

महामार्ग पोलिसांच्या तपासणीदरम्यान ट्रकमधून वास आला आणि कोट्यवधी रुपयांच्या गुटखा तस्करीचा भांडाफोड झाला. तब्बल १.३१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला (पान २ वर)

## संपादकीय

### युद्धच ठरले डोकेदुखी

इराणविरुद्ध २८ फेब्रुवारीच्या पहाटे अमेरिका आणि इस्रायलने सुरू केलेली लष्करी कारवाई संपुष्टात आल्याचे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी अलीकडेच जाहीर केले. ही मौलिक माहिती त्यांच्यासारख्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली हे बरे झाले. कारण सध्या तरी इराण आणि अमेरिका व इस्रायल यांच्या दरम्यान फेब्रुवारी अखेर सुरू झालेल्या विध्वंसक युद्धात विराम घोषित झाल्याचे वाटत होते. रुबियो यांच्या म्हणण्याचा रोख असा, की युद्धविराम जाहीर झाल्यानंतर आणि कित्येक दिवस तो पाळला गेल्यानंतर युद्ध संपल्यातच जमा आहे. कारण युद्धाची सारी उद्दिष्टे सफल झालेली असल्यामुळे ते पुन्हा सुरू करण्यात कुठलाच मतलब नाही. त्यांच्या या घोषणेपाठोपाठ खुद्द अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच ङ्गप्रोजेक्ट फ्रीडमम ही नाविक कारवाई स्थगित करत असल्याची घोषणा केली. होर्मुझ सामुद्रधुनीमधून व्यापारी आणि तेलवाहू जहाजांना सुरक्षितपणे बाहेर येता यावे, यासाठी अमेरिकी नौकांचे संरक्षण पुरवू, असे आश्वासन ट्रम्प यांनी ङ्गप्रोजेक्ट फ्रीडमम अंतर्गत दिले होते. त्याचा भलताच परिणाम झाला. कारण इराणने ही कृती म्हणजे एक प्रकारचे आक्रमण मानून प्रतिहल्ले सुरू केले. इतक्या दिवसांनंतर युद्धविरामाचा भंग झाला, तशी ही मोहीम मागे घेऊन ट्रम्प यांनी आणखी एक माघार घेतली. त्यांची ही कृती इराणविरोधात अमेरिका आणि इस्रायलने सुरू केलेल्या लष्करी कारवाईतील धरसोडपणाचेच निदर्शक आहे. आता दोन्ही बाजूंकडून कायमस्वरूपी शांतता प्रस्तावावर चर्चा सुरू झालेली आहे. पण मुळात इराणवर आक्रमण करून हजारोंना मृत्युमुखी धाडून, कोट्यवधी डॉलर्सचा चुराडा करून नि जागतिक खनिज तेलसाखळी आणि अर्थव्यवस्थेला अस्थिरतेच्या गर्तेत ढकलून अमेरिका आणि युद्धपिपासू इस्रायलने नेमके काय साधले, याचा लेखाजोखा मांडावा लागेल. इराणवर गेल्या वर्षी जून महिन्यात इस्रायल आणि अमेरिकेने संयुक्त कारवाई केली, त्यावेळी तिचा उद्देश इराणचा अण्वस्त्र कार्यक्रम संपुष्टात आणणे, इराणची हवाई संरक्षण क्षमता उद्‌ध्वस्त करणे हा होता. अमेरिकेने बंकरभेदी बॉम्बचा वापर करून इराणच्या सगळ्या अण्वस्त्र प्रकल्पांना मातीमोल केल्याचे ट्रम्प यांनीच जाहीर केले होते. तरीदेखील नऊ महिन्यांतच पुन्हा एकदा इराणवर हल्ले करण्यात आले, तेव्हा या नवीन मोहिमेची पाच उद्दिष्टे सांगण्यात आली. इराणमध्ये राजवट बदल, इराणी नौदलाचा नायनाट, इराण समर्थित दहशतवादी गटांचा नि:पात, इराणच्या क्षेपणास्त्रविकासावर निर्बंध आणि इराणला अण्वस्त्रे विकसित करण्यापासून प्रतिबंध या पाच उद्दिष्टांपैकी इराणी नौदलाचा नायनाट हेच १०० टक्के यशस्वी झाले असे म्हणता येईल. इराणची क्षेपणास्त्र आणि ड्रोन क्षमता अजूनही ५० टक्के शाबूत असल्याचे पेंटॅगॉन हा अमेरिकेचा संरक्षण विभागच नमूद करतो. हेझबोला आणि हमास यांची सध्या निर्नायकी अवस्था असली, तरी यांतील हेझबोलाचे उपद्रवमूल्य कायम असल्याचे स्पष्ट आहे. हा गट आजही इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागतच आहे. या दोन गटांपेक्षा वेगळा असा हुथी गट अजूनही येमेनमध्ये सक्रिय आहे. त्याचा उपद्रव लाल समुद्रातील व्यापारी सागरमार्गात पुरेसा गंभीर आहे. होर्मुझसारखीच आणखी एक सामुद्रधुनी अर्थात बाब एल मंडेब सर्वस्वी हुथींच्याच ताब्यात आहे. होर्मुझची नाकेबंदी उठली नाही आणि या नव्या सामुद्रधुनीत हुथींनी धुडगूस घातला तर हाहाकार उडेल. कारण एक जगातील प्रमुख तेल वाहतूक मार्ग आहे, तर दुसरा व्यापारी वाहतूक मार्ग. राहता राहिला मुद्दा इराणमधील राजवट बदलाचा. त्यांचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला अली खामेनी अमेरिका-इस्रायलच्या कारवाईत पहिल्याच दिवशी मारले गेले. या घटनेनंतर इराणमध्ये सरकारविरोधी आणि उदारमतवादी समूहांना बळ मिळेल आणि त्यातून खामेनी राजवट उलथवली जाईल, असा ट्रम्प प्रशासनाचा होरा होता. पण तसे घडलेले नाही.

# पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूलशी माझे भावनिक नाते : चिंतनभाई पटेल

## हस्ती बँकेकडून शुद्ध व थंड आरओ प्लँटचे लोकार्पण

प्रतिनिधी । शिरपूर

**शिरपूर वरवाडे नगर परिषद संचलित शहरातील पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिरपूर येथे दी हस्ती को बँक दोंडाईचा यांच्या सौजन्याने दिलेल्या शुद्ध व थंड आरओ प्लँटचे लोकार्पण लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते करण्यात आले.**




कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी दी हस्ती को बँकेचे चेअरमन कैलास जैन हे होते. यावेळी उपनगराध्यक्षा संगीता देवरे, दी हस्ती को बँक शिरपूरचे चेअरमन कैलासचंद्र अग्रवाल, शिक्षण सभापती श्यामकांत ईशी, बांधकाम सभापती वासुदेव देवरे, अरुणा थोरात, आरोग्य सभापती डॉ. वृषाली बडगुजर, नगरसेवक रोहीत रंधे, आशिष पाटील, दीपक माळी, हर्षल राजपूत, राज हलकार, चिंतनभाई पटेल सिसोदिया, बाबुलाल माळी, अनिता गोसावी, रिना पटवे, मनिषा पाटील, वर्षा रविंद्र माळी, मिनाक्षी पाटील, प्रतिभा भिल, केतकी भोई, रविंद्र माळी, प्रशासकीय अधिकारी संजय हासवाणी, विनायक कोळी, भालेराव माळी, मुख्याध्यापक एस. आर. गवळी, उपमुख्याध्यापिका जे. एस. सोनवणे, पर्यवेक्षक आर. सी. पावरा, के. के. पावरा, अधीक्षक जितेंद्र जाधव, मोहन चौधरी आदी उपस्थित होते.

चिंतनभाई पटेल म्हणाले, या शाळेत शिरपूर वरवाडे नगरपरिषद गटनेते तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल हे शिकले असल्याने या शाळेशी माझे भावनिक नाते आहे. या शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी मला बरंच काही करायचं आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात कैलास जैन यांनी सांगितले, आमदार अमरिशभाई पटेल व भूपेशभाई पटेल यांच्या दूरदृष्टीने ही शाळा तयार झाली आहे. ही शाळा नगरपरिषदेची शाळा आहे. हे पाहुन मला आश्चर्य वाटते. तसेच आज या शाळेकडून मला बरंच काही शिकायला मिळालं ते मी माझ्या शाळेतही राबवेल, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून शिक्षण सभापती शामकांत ईशी यांनी शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शिक्षक योगेंद्र गिरासे यांनी शैक्षणिक वर्षातील विविध क्षेत्रातील यशाविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन एस.डी.माळी यांनी तर आभार जे. एस. सोनवणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयेश महाजन, भूषण मोरे, राकेश कोळी, हरीष पाटील, मजहर सैय्यद, प्रमोद भोई, दीपक जाधव, भिमा माथने, प्रफुल्ल मराठे यांनी प्रयत्न केले.

## संघवी हायस्कूलचे १० वीच्या परीक्षेत घवघवीत यश

प्रतिनिधी । पाचोरा

पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था मर्या., पाचोरा संचलित श्री. एच.बी. संघवी माध्यमिक विद्यालय खेडगाव येथील इयत्ता दहावीचा निकाल उल्लेखनीय लागला आहे. विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ७६.४७ टक्के लागला आहे.

परीक्षेसाठी एकूण ६५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक कु. मयुरी अनिल बागुल, ८७ टक्के द्वितीय क्रमांक शहबाज अमीन मन्यार ७९टक्के, तृतीय क्रमांक कु. वेदश्री सुनील बाविस्कर ७७ टक्के, चतुर्थ क्रमांक नरेंद्र गोविंदा जाधव ७६टक्के, पाचवा क्रमांक कृष्णा मंगल सोनवणे ७६टक्के यांनी घवघवीत यश संपादन करून विद्यालयाचे नाव उज्वल केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी संजय वाघ, दिलीप वाघ, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांनी, ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## नंदुरबार येथे उद्या आरोग्य शिबिर

प्रतिनिधी । नंदुरबार

आरोग्य विभागामार्फत एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे संकल्प सप्ताहानिमित्त राज्यभर थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नंदुरबार जिल्हा रुग्णालय यांच्या वतीने महिला रुग्णालयाच्या बालविकास व उपचार विभागात विशेष अस्थिमज्जा जुळवणी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनवणे यांनी दिली आहे. हे शिबिर दि.१२ मे सकाळी १० वाजता महिला रुग्णालय (नंदुरबार) येथील पहिल्या मजल्यावरील बाल विकास विभागात होणार आहे.

## शिरपूर तालुक्यासाठी जनगणनेची पहिल्या टप्प्याची तयारी पूर्ण

प्रतिनिधी । शिरपूर

तालुक्यासाठी जनगणनेची पहिल्या टप्प्याची तयारी पूर्ण झाली आहे. जनकल्याणासाठी जनगणना हे ब्रीद घेऊन यंदा १६ वी जनगणना डिजिटल पद्धतीने घर यादी व लोकसंख्या गणना अशा दोन टप्प्यात होत आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकांना स्वगणनाअंतर्गत स्वत:ची माहिती ऑनलाइन पोर्टलवर भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी या पोर्टलवर लॉगिन करून माहिती भरल्यानंतर एक युनिक आयडी तयार होईल,



जो संबंधित प्रगणकास सादर करणे अनिवार्य आहे. यानंतर १६ मे ते १४ जून या काळात नियुक्त प्रगणक प्रत्यक्ष घरांना भेटी देऊन माहिती संकलित करणार आहेत. घर यादी व घर गणना या पहिल्या टप्प्यासाठी शिरपूर तालुक्यात ५७५ घर यादी गटांकरिता ५७४ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच या कामासाठी ९६ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. १०टक्के राखीव कर्मचारी देखील नियुक्त करण्यात आले आहेष. नियुक्त केलेले सर्व प्रगणक त्यांच्या मोबाईलमधील ॲपच्या मदतीने ३३ प्रश्नांची माहिती नागरिकांकडून संकलित करून ती ॲपमध्ये नोंदवतील. नागरिकांनी दिलेली माहिती जनगणनेच्या कायद्यानुसार पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार आहे. या मोहिमेसाठी १० फिल्ड ट्रेनर्स मार्फत प्रगणकांना २७ एप्रिल ते ७ मे या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## महात्मा फुले हायस्कूलमध्ये एसएससी परीक्षेत वैभव माळी प्रथम

प्रतिनिधी । धरणगाव





शहरातील सुवर्ण महोत्सवी शाळा महात्मा फुले हायस्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी एसएससी बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. दि. ८ मे ला दहावीचा ऑनलाईन निकाल घोषित झाला. शाळेचा निकाल ६० % लागला. शाळेतून प्रथम वैभव राकेश माळी ८९ %, द्वितीय शितल भोई ८२ %, तृतीय सिद्धार्थ बैसाणे ७६.८० % यांचा शाळेचे मुख्याध्यापक जे.एस. पवार, वर्गशिक्षक एस.व्ही.आढावे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपशिक्षक एच.डी. माळी, एम.बी. मोरे, पी.डी. पाटील , व्ही. टी.माळी, एस.एन. कोळी, शाळेचे ज्येष्ठ लिपिक जे.एस. महाजन, पी.डी. बडगुजर, ग्रंथपाल गोपाल महाजन, जीवन भोई, अशोक पाटील तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## पान १ वरुन

**जळगाव महापालिका......**

जमा केला. मात्र, उर्वरित १६ उमेदवारांनी अद्याप कोणताही खुलासा किंवा खर्चाचा अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित उमेदवारांविरोधातील सविस्तर प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविला आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित उमेदवारांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. विशेषतः पुढील तीन वर्षांसाठी कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था अथवा निवडणूक लढविण्यास बंदी घालण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने संबंधितांच्या राजकीय भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई महत्त्वाची मानली जात असून, निवडणूक प्रक्रियेत नियमांचे पालन न करणाऱ्या उमेदवारांना यामुळे मोठा धक्का बसू शकतो. विशेष म्हणजे, खर्चाचा तपशील सादर न करणाऱ्या उमेदवारांमध्ये केवळ अपक्ष उमेदवारच नाहीत, तर विविध राजकीय पक्षांशी संबंधित उमेदवारांचाही समावेश आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, काँग्रेस, स्वराज्य शक्ती सेना तसेच इतर पक्षांच्या उमेदवारांची नावे या यादीत असल्याने या प्रकरणाला अधिक राजकीय रंग प्राप्त झाला आहे.

**पाचोऱ्यात भूसंपादन घोटाळा......**

संबंधित विभागांना नोटिसा बजावण्यात आल्यानंतर या प्रकाराची माहिती उघड झाली. त्यानंतर भूसंपादन विभागाने जिल्हा न्यायालयात तक्रार दाखल केली होती. संशयितांमध्ये यांचा समावेश – या प्रकरणात ॲड. किशोर बी. पाटील, ॲड. प्रशांत बाविस्कर, रघुनाथ शंकर पाटील, कमळाबाई रघुनाथ पाटील, अशोक हिम्मत वाघे, रामकृष्ण लक्ष्मण चौधरी, मिश्रीलाल हिरालाल तेली, भगवान माणिक ठाकरे, भागाबाई माणिक ठाकरे, राजेंद्र मधुकर नाईक, रवींद्र मधुकर नाईक, शिवचरण माणिक ठाकरे आणि शोभाबाई ईश्वर पाटील यांच्यासह एकूण १७ जणांचा समावेश आहे. काही संशयितांनी एकापेक्षा अधिक अर्ज सादर केल्याची माहितीही तपासातून पुढे आली आहे. या प्रकरणामुळे महसूल विभाग, न्यायालयीन प्रक्रिया आणि भूसंपादन यंत्रणेतील सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**चाळीसगावच्या मैतर कॉलनीत......**

मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या मैतर कॉलनी परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. हल्ल्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण असले तरी परिस्थिती नियंत्रणात असून सध्या ङ्गतणावपूर्ण शांतताफ कायम आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विविध पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

**'समृद्धी'वरून गुटखा......**

आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. समृद्धी महामार्गावर महामार्ग पोलिसांनी मोठी कारवाई केली. तब्बल १ कोटी ३१ लाख ५१ हजार २५० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त केला. समृद्धी महामार्गावरील कारंजा (लाड) टोल नाका येथे महामार्ग पोलिसांकडून वाहन तपासणी सुरू होती. यावेळी महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग नागपूरचे पोलीस अधीक्षक यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक कृष्ण कन्हैया पवार व पोलीस अंमलदार यांनी संशयित ट्रक थांबवून तपासणी केली.

**रुपाली चाकणकरांची......**

नोटीस बजावल्याचे वृत्त झळकले होते. मात्र, त्यांनी नकार देत मला कुठलीही नोटीस आली नसल्याचं म्हटलं होतं. अखेर, आज त्यांना एसआयटीच्या चौकशीला सामोरे जावे लागले. अशोक खरात प्रकरणात एसआयटी पथकाकडून अद्यापही चौकशी सुरू असून वेगवेगळ्या गुन्ह्यात पोलिसांनी आरोपी अशोक खरातची पोलीस कोठडी वाढवून घेतली आहे. त्यातच, यापूर्वी रुपाली चाकणकर यांच्या बहिणीची एसआयटीने चौकशी केली असून पतसंस्थेतील आर्थिक व्यवहारासंदर्भात ही चौकशी झाल्याची माहिती आहे. आता, प्रत्यक्ष रुपाली चाकणकर यांची देखील आज चौकशी झाली. त्यानंतर, त्यांनी माध्यमांशी बोलताना भूमिका स्पष्ट केली. पोलिसांना जे आवश्यक होतं त्यात मी सर्व सहकार्य केलं आहे, एसयटी तपासात मी तपास यंत्रणांसोबत सविस्तरपणे बोलेले. माझ्या चौकशी संदर्भात सविस्तर अहवाल तुमच्यापर्यंत येईल. मी सध्या पुण्याला निघाले आहे, एसआयटीपुढे समर्पक उत्तर दिली आहेत, असे म्हणत रुपाली चाकणकर यांनी अधिकचे बोलणे टाळले.

## जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेला प्रारंभ

प्रतिनिधी । जळगाव

जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने स्व. डॉ. घनश्याम कोचुरे यांच्या जयंतीनिमित्त डॉ. घनश्याम कोचुरे मेडिकल फाउंडेशनतर्फे आयोजित जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा २०२६ चे उद्घाटन आज ॲड. रेखा कोचुरे व पराग कोचुरे यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा ९ व १० मे २०२६ या कालावधीत कांताई सभागृह, जिल्हा पेठ, जळगाव येथे पार पडणार आहे. स्पर्धेत जिल्ह्यातील नामांकित तसेच उदयोन्मुख कॅरम खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या स्पर्धेचा मुख्य उद्देश कॅरम या खेळाला प्रोत्साहन देणे तसेच नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा असल्याचे ॲड. रेखा कोचुरे यांनी उद्घाटन प्रसंगी सांगितले. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख बक्षिसे पराग कोचुरे आणि ॲड. रेखा कोचुरे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्यांसह खेळाडूंचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.

## पाचोरा येथे महाराणा प्रताप जयंती साजरी

प्रतिनिधी । पाचोरा

**मेवाडच्या मातीचा अभिमान आणि हिंदवी शौर्याचा अखंड जाज्वल्यदीप, वीर शिरोमणी, हिंदूसूर्य महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त महाराणा प्रताप चौकात प्रतिमा पूजन करून माल्यार्पण करण्यात आले.**



भाजप नेत्या वैशाली सूर्यवंशी तसेच उपस्थित मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रत्येकाच्या हृदयात शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणाज्योत प्रज्वलित झाली.

महाराणा प्रतापांच्या अदम्य साहसाची गाथा आठवत उपस्थितांच्या मनात स्वाभिमानाची नवी चेतना जागृत झाली. या प्रसंगी पाचोरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष किशोर बारवकर, उद्धव मराठे, पदम पाटील, पप्पू राजपूत आदी मान्यवर उपस्थित होते.

## चार वर्षांत महाराष्ट्रात ५०० हून अधिक सत्यशोधक विधी : अरविंद खैरनार

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील मोठा माळीवाडा समाज सभागृहात सत्यशोधक समाज संघाची सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांचा जागर, सामाजिक प्रबोधन आणि सत्यशोधक चळवळीचा प्रसार हा या सभेचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी सत्यशोधक समाज संघाचे जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील यांनी प्रास्ताविकातून संघाच्या गेल्या चार वर्षांतील कार्याचा आढावा घेतला. यामध्ये सत्यशोधक विवाह, दशपिंड विधी, गृहप्रवेश, साक्षगंध सोहळे तसेच सत्यशोधक विधीकर्ते प्रशिक्षण शिबिरांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने सुरू असल्याची माहिती दिली.**



तत्पूर्वी संत सावता महाराज, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सभेच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक समाज संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अरविंद खैरनार होते. प्रमुख अतिथी म्हणून मोठा माळीवाडा समाजाध्यक्ष व्ही. टी. माळी, लहान माळीवाडा समाजाध्यक्ष रामकृष्ण महाजन उपस्थित होते. मान्यवरांचा शाल व महापुरुषांचे ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी व्ही. टी. माळी यांनी सत्यशोधक समाज संघाच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक करत, समाजातील युवकांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात अरविंद खैरनार यांनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा इतिहास उलगडून सांगत, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांनी अज्ञान, अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले की, गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रभर ५०० हून अधिक सत्यशोधक विवाह, दशपिंड विधी, गृहप्रवेश आणि साक्षगंध सोहळे पार पडले आहेत. बहुजन समाजाने कर्मकांड आणि अंधश्रद्धेपासून दूर राहून सत्यशोधक विचार आत्मसात करावेत, महापुरुषांचे साहित्य घरोघरी पोहोचवावे आणि वाचन संस्कृती वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभर निबंध, वक्तृत्व, चित्रकला, प्रश्नमंजुषा स्पर्धा, रक्तदान शिबिरे, पुस्तक प्रकाशन, वृक्षारोपण आणि कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण अभ्यासवर्ग अशा विविध सामाजिक-शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. यावेळी राजेंद्र वाघ यांनी २३ व २४ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथे राज्यस्तरीय अभ्यासवर्ग आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देत, जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास नगरसेविका ज्योती पाटील, नगरसेवक परमेश्वर महाजन, लक्ष्मण महाजन, कडू महाजन, एस. डब्ल्यू. पाटील, राजेंद्र माळी, शिवदास महाजन, सुनिल सोनार, कैलास पवार, वासुदेव महाजन, सुनील देशमुख, आप्पी महाजन, निलेश पवार, निवृत्ती माळी, दिपक माळी, भटूलाल महाजन, भैय्या धनगर, हेमंत माळी, प्रिती पाटील, ललिता वाघ यांच्यासह बहुजन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✽ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✽ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१८७८ : मराठी ग्रंथकाराचे पहिले संमेलन.

१९२० : स्त्रियांना पदवी परीक्षेसाठी प्रवेश देण्याचा ऑक्सफर्ड विद्यापीठाचा निर्णय.

१९५१ : गझनीच्या महंमदने उद्ध्वस्त केलेल्या बारा जोतिलिंगापैकी एक सोमनाथ या मंदिरात शिवलिंग प्रतिष्ठापना डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते झाली.

१९९३ : मराठी चित्रपटातील ज्येष्ठ अभिनेते शाहू मोडक यांचे निधन.

# जामनेरमध्ये सट्ट्यावर एलसीबीची धाड

## १० लाखांच्या मुद्देमालासह चौघांना बेड्या!

**प्रतिनिधी । जामनेर**

**आयपीएल क्रिकेट सामन्यांवर ऑनलाईन सट्टा लावून जुगार खेळणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे. जामनेर पोलीस स्टेशन हद्दीतील हिवरखेडा रोड परिसरात सुरू असलेल्या या ऑनलाईन सट्टा अड्ड्यावर छापा टाकत पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतले.**

जामनेर परिसरात काही इसम घरामध्ये बसून आयपीएल क्रिकेट मॅचवर ऑनलाईन सट्टा लावत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी खात्री करून नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकला. या कारवाईत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम व इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त करण्यात आले.




छाप्यामध्ये पोलिसांनी ९ लाख २ हजार ३०० रुपये रोख रक्कम, १ लाख ३० हजार रुपये किमतीचे मोबाईल फोन, २५ हजार रुपये किमतीचा टीव्ही व साउंड बार, तसेच ४१ एटीएम कार्ड असा मुद्देमाल हस्तगत केला. इतर साहित्यांसह एकूण १० लाख ५३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणात देवानंद सुभाष सोनवणे, रितेश अशोक नेरकर, परीक्षित रविंद्र पाटील आणि प्रवीण जगन्नाथ टहाकडे, सर्व रा. जामनेर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### • ग्रामीण भागात लोण

क्रिकेट खेळावर विश्वकप स्पर्धेवेळी सट्टा लावण्याचे प्रकार मोठ्या शहरात उघडकीस येत होते.परंतु मोबाईलमध्येच आयपीएल खेळण्यावर आत्ता सट्टा लावला जात असल्याने शाळकरी मुलेही याकडे आकर्षीत झालले आहेत.

या कारवाईवरून जामनेर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २३६/२०२६ नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम ४ आणि ५ अंतर्गत चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# पाचोरा लोकन्यायालयात ४.२६ कोटींची वसुली; १३० प्रकरणांचा निपटारा



**प्रतिनिधी । पाचोरा**

**पाचोरा न्यायालयाच्या प्रांगणात तालुका विधीसेवा समिती, पाचोरा आणि पाचोरा तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम एस. व्ही. निमसे, तालुका विधी सेवा समिती पाचोरा अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी पाचोरा तहसीलदार विजय बनसोड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**

राष्ट्रीय लोकअदालतीत मुख्य न्यायाधीश एस. व्ही. निमसे आणि सहन्यायाधीश जी. एस. बोरा यांच्या न्यायालयातील एकूण १०६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमधून तब्बल ३ कोटी ७० लाख ३६ हजार ६७६ रुपयांची वसुली करण्यात आली. तसेच २४ वादपूर्व प्रकरणांचाही यशस्वी निपटारा करण्यात आला. यातून ५५ लाख ८४ हजार ८८५ रुपयांची वसुली झाली. अशा प्रकारे एकूण १३० प्रकरणांचा निपटारा करत ४ कोटी २६ लाख २१ हजार ५६१ रुपयांची एकत्रित वसुली करण्यात आली. लोकन्यायालयाच्या पंच ॲड.भाग्यश्री महालपुरे, ॲड. प्रविण बी. पाटील, उपाध्यक्ष ॲड. कविता मासर, यांच्यासह सर्व वरिष्ठ व कनिष्ठ विधिज्ञ, बँक अधिकारी, कर्मचारी, बीएसएनएल, कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### पी.आर. हायस्कूलचा निकाल ९७ टक्के



**धरणगाव ।** धरणगाव शहरातील पी.आर. हायस्कूलचा इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल ९६.२७ टक्के लागला. यात १६१ पैकी १५५ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. यात ५२ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये तर ८४ विद्यार्थी फर्स्ट क्लासमध्ये उत्तीर्ण झालेले आहेत.

यात प्रथम नीरज मनोज सुतारे ८९.२० टक्के ,द्वितीय जयेश प्रकाश चौधरी ८८.२० टक्के, तर तृतीय क्रमांक लोकेश शीतलकुमार पवार ८७.६० , सृष्टी गणेश महाजन ८७.६०, यांनी मिळविला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. अरुण कुलकर्णी सचिव डॉ. मिलिंद डहाळे संचालक अजय पगारिया, मुख्याध्यापक डी.एस. पाटील,पर्यवेक्षक डी. एच. कोळी, आर. जे. धनगर, जी.आर. सूर्यवंशी,पी. व्ही. असोदेकर, एस. केबेलदार, जितेंद्र बोरसे यांच्यासह संचालक मंडळ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी अभिनंदन केले आहे.

# धरणगावात जीपीएस फाउंडेशनतर्फे मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## १६० नागरिकांची तपासणी; ४० रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया, ५० गरजूंना मोफत चष्मे

**प्रतिनिधी । धरणगाव**

**शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत जीपीएस फाउंडेशन, जीपीएस मित्र परिवार आणि धरणगाव शिवसेना शहर शाखेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू निदान व चष्मा तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळील कार्यालयात पार पडलेल्या या शिबिरामध्ये शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली.**

सदरील शिबिर आर. आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण १६० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर तपासणीदरम्यान ४० रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. याशिवाय ५० गरजू नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना शहरप्रमुख धिरेंद्र पुरभे यांनी दिली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच अत्याधुनिक नेत्रसेवा उपलब्ध झाली. फिरते नेत्रालय गावोगावी पोहोचून गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांच्या दारात आरोग्यसेवा पोहोचवत असल्याने नागरिकांनी या उपक्रमाचे विशेष स्वागत केले.



ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य नागरिकांना या शिबिराचा मोठा लाभ झाला. यावेळी बोलताना जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, जळगाव ग्रामीण मतदारसंघ मोतीबिंदूमुक्त करण्याच्या दिशेने जीपीएस मित्रपरिवाराने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना मोफत आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक असोत वा सर्वसामान्य जनता, त्यांच्या आरोग्याशी संबंधित कोणत्याही अडचणींसाठी आम्ही सदैव खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे आहोत. अशा लोकहितकारी उपक्रमांमुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट साध्य होत आहे. जीपीएस मित्रपरिवार व प्रतापराव पाटील यांनी सामाजिक कार्याचा वसा जपत राबविलेल्या या उपक्रमामुळे शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.



आ. अनिल पाटील यांच्या हस्ते पूजन व माल्यार्पण

# अमळनेरात महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

**प्रतिनिधी । अमळनेर**

**येथील अमळनेर तालुका राजपूत एकता मंचतर्फे शुक्रवार, दि. ९ मे रोजी हिंदू सूर्यकुल वीर शिरोमणी श्री महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

शहरातील महाराणा प्रताप चौक येथील महाराणा प्रताप यांच्या स्मारकस्थळी हा कार्यक्रम संपन्न झाला. माजी मंत्री व आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या स्मारकाचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी महाराणा प्रताप यांच्या शौर्याला व स्वाभिमानाला अभिवादन करत समाजबांधवांनी एकजुटीचा संदेश दिला. यावेळी देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमला होता. उपस्थित सर्व मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन केले.

### • चेतन राजपूत यांचा झाला सत्कार

यावेळी अमळनेर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राजपूत ऐकता मंचतर्फे चेतन राजपूत यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास संजय पुनाजी पाटील,जयनिल फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम पाटील, नगरसेवक सचिन पाटील, जितेंद्र ठाकूर, कामगार नेते एल.टी. पाटील, यांच्यासह राजपुत एकता मंचचे अध्यक्ष रणजित पाटील,नरेंद्रसिंग ठाकूर,अंबरसिंग पाटील,अनिल पाटील, प्रकाश पाटील,ॲड दीपेन परमार,विजयसिंग पवार,गोकुळ पाटील,अजयसिंग पाटील,दीपेन राजपूत,ओंकार राजपूत,भरतसिंग पाटील,ओंकार राजपूत,जितेंद्र पाटील,नरेंद्र पाटील,बापू पाटील,सुनिल पाटील,जयदीप राजपुत,नचिकेत महाले,केदारसिंग राजपूत,विजयसिंग पाटील,दिनेश पाटील,ज्ञानेश्वर राजपूत,विलास राजपूत,मुकेश राजपूत,जयदीप राजपूत,मनोज पाटील,सूरज परदेशी,सर्व राजपूत समाजबांधव आणि महाराणा प्रताप प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९६.२० टक्के

**प्रतिनिधी । धरणगाव**

**येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने यंदाच्या एस.एस.सी. परीक्षेत ९६.२० टक्के इतका उल्लेखनीय निकाल लावत उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या दमदार यशामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षकवृंदामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

यावर्षी विद्यालयातून एस.एस.सी. परीक्षेसाठी एकूण ७९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ७६ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. विशेष बाब म्हणजे ६० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तर ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत विद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. दिशा दीपक पाटील हिने ४६३ गुण (९२.६० टक्के) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. गुंजन प्रेमराज पाटील हिने ४६२ गुण (९२.४० टक्के) मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच तृतीय क्रमांक दोन विद्यार्थिनींनी संयुक्तरीत्या ४५९ गुण (९१.८० टक्के) मिळवत संपादन केला. विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष सी.के.पाटील, सचिव सुरेखा पाटील तसेच संचालक मच्छिंद्र पाटील, अश्विनकुमार पाटील व आशिषकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकवृंदाचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक



वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या या यशामुळे परिसरात सर्वत्र कौतुक व्यक्त होत आहे. आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

### धरणगाव तालुक्यात रस्ते शुकशुकाट पारा ४३ , उष्ण लहरींचा फटका

**प्रतिनिधी । धरणगाव**

शहरासह तालुक्यात सूर्य आग ओकू लागला असून तापमानाचा पारा ४३ च्या पार पोहचला आहे. अधिक तापमानामुळे अंगाची लाही- लाही होत असून दुपारी बाहेर जाऊ नका, असा सल्ला देखील दिला जात आहे. गेल्या दोन दिवसांपासून तापमानात अधिक प्रमाणात वाढ झालेली आहे. दुपारी उष्ण लहरी सुटू लागल्या असून छतांवर ठेवलेल्या पाण्याच्या टाकीचे पाणी देखील उकळू लागले आहे. तालुक्यात मका काढणीची लगबग देखील सुरू झाली आहे.

# धरणगाव पालिकेच्या ५९ सफाई कर्मचाऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

## कर्मचाऱ्यांविरोधात खोट्या गुन्ह्यांच्या धमक्यांचा आरोप

**प्रतिनिधी । धरणगाव**

येथील नगरपरिषद प्रशासन व आरोग्य विभागातील ५९ सफाई कर्मचारी आणि मुकादम यांनी वैशाली राजेंद्र मोरे (सफाई कामगार), यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाची लेखी तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांकडून वरिष्ठ अधिकारी व सहकाऱ्यांना खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच याप्रकरणी सखोल चौकशी करून प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे. दि.६ मे रोजी सादर करण्यात आलेल्या या तक्रार निवेदनात नगरपरिषद धरणगाव येथील ५९ सफाई कर्मचारी व मुकादमांनी स्वाक्षरी करून आपली भूमिका मांडली आहे. संबंधित महिला कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीमुळे विभागातील कामकाजावर परिणाम होत असून कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे. तक्रारीनुसार संबंधित कर्मचाऱ्यांची नियुक्ती शहरातील स्मारकांच्या साफसफाईसाठी करण्यात आलेली असताना त्या वारंवार कामात कसूर करतात,




तसेच नेमून दिलेल्या कामाच्या ठिकाणी नियमित उपस्थित राहत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांनी असेही म्हटले आहे की, साफसफाईचे मूळ काम करण्यास सांगितले असता त्या प्रशासनावर दबाव आणून टेबल-खुर्चीवर बसून करण्याचे काम द्यावे अशी वारंवार मागणी करतात.

**तक्रारीतील आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे वरिष्ठ अधिकारी, आरोग्य निरीक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकविण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोप.**


सफाई कामगार वैशाली राजेंद्र मोरे यांना वरिष्ठ अधीक्षक, आरोग्य निरीक्षक, मुकादम यांनी कामाबाबत विचारणा केल्यास संबंधित कर्मचारी महापुरुषांच्या नावाचा आधार घेत अधिकाऱ्यांना धमकावत असल्याचे देखील निवेदनात म्हटले आहे. याशिवाय, कामाच्या ठिकाणी मोबाईलवर व्हिडिओ चित्रीकरण करून फेसबुक व इतर समाजमाध्यमांवर चुकीची माहिती प्रसारित केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे प्रशासनाची तसेच कर्मचाऱ्यांची प्रतिमा मलीन होत असल्याची खंत तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. तक्रारीत जातीय भेदभावाचे आरोपही फेटाळण्यात आले आहेत. बहुतांश कर्मचारी हे स्वतः मागासवर्गीय समाजातील असल्याचे नमूद करत, आजपर्यंत कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने जातीय आधारावर अन्याय केल्याची घटना घडलेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. उलट अशा आरोपांमुळे इतर कर्मचाऱ्यांचे मनोबल खचत असून कामकाजात अडथळे निर्माण होत असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

# एम. जे. कॉलेज परिसरातील तीन कॅफेंवर पोलिसांची धडक कारवाई!

**प्रतिनिधी । जळगाव**

**शहरातील विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असलेल्या एम. जे. कॉलेज परिसरातील तीन कॅफेंवर पोलिसांनी अचानक धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, इतर कॅफे चालकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे या मोहिमेत महिला सुरक्षेसाठी कार्यरत असलेले दामिनी पथक देखील सहभागी होते.**

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबवण्यात आली. एम. जे. कॉलेज परिसरातील काही कॅफेमध्ये नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तसेच काही गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांनी विशेष पथकाची स्थापना केली होती. या पथकामध्ये पोलीस कर्मचारी अवेश शेख, प्रणय पवार आणि अमोल ठाकूर यांचा समावेश होता. पोलिसांनी एकाच वेळी तीन कॅफेंवर धाड टाकून तपासणी केली. कॅफेंमधील खोल्या, बसण्याची व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच ग्राहकांची चौकशी करण्यात आली. काही ठिकाणी 'कपल बॉक्स' स्वरूपातील बंदिस्त व्यवस्था असल्याची माहितीही समोर आली आहे. या कारवाईत 'दामिनी पथक' सहभागी असल्यामुळे महिला सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांकडून विशेष लक्ष दिले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. महाविद्यालयीन परिसरात विद्यार्थिनींची मोठी वर्दळ असल्याने कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, तसेच परिसरातील कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पोलिसांनी ही मोहीम हाती घेतल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, पोलिसांनी तीनही कॅफेंची कसून तपासणी केली असून संबंधितांकडून आवश्यक कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.



# अमळनेर रेल्वे स्थानकावर अल्पवयीन मुलीसह तरुण ताब्यात

## उत्तर प्रदेशातून पळवून आणल्याचा पोलिसांना संशय

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील रेल्वे स्थानकावर संशयास्पदरीत्या आढळून आलेल्या एका तरुणासह अल्पवयीन मुलीला जीआरपी व आरपीएफच्या पथकाने ताब्यात घेतल्याची घटना दि. ७ मे रोजी दुपारी घडली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात यश आले आहे.**




अमळनेर रेल्वे स्थानकावर जीआरपी व आरपीएफचे कर्मचारी नियमित गस्त घालत असताना प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर एक तरुण आणि त्याच्यासोबत अल्पवयीन मुलगी संशयास्पद अवस्थेत बसलेली दिसून आली. संशय आल्याने पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन अमळनेर लोहमार्ग पोलीस चौकीत चौकशीसाठी आणले.

चौकशीदरम्यान दोघांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर मुलीकडून तिच्या वडिलांचा मोबाईल क्रमांक घेऊन संपर्क साधण्यात आला. यावेळी संबंधित तरुणाने त्यांच्या अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेल्याची माहिती मुलीच्या वडिलांनी दिली. या प्रकरणी उत्तर प्रदेशातील मिर्झापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.मुलीच्या पालकांनी आणि संबंधित पोलिसांनी अमळनेर येथे येईपर्यंत दोघांना ताब्यात ठेवण्याची विनंती केली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने कारवाई करत अल्पवयीन मुलीस बालसुधारगृहात रवाना केले. तिची वैद्यकीय तपासणीही करण्यात आली. त्यानंतर मुलीस तिच्या पालकांच्या व संबंधित पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. दरम्यान, ताब्यात घेण्यात आलेल्या तरुणाचे नाव राजराम कुमार गुप्ता (वय २२) असे असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील रहिवासी असून सध्या गुजरात येथे वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई नंदुरबार लोहमार्ग पोलीस ठाणे अंतर्गत अमळनेर रेल्वे पोलीस चौकीचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल शिजवळकर, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक मधुकर विसावे, पोलीस हवालदार नरेंद्र लोंढे, घोराडे तसेच आरपीएफचे एएसआय कुलभूषण सिंग व हेड कॉन्स्टेबल नंदू पाटील यांनी केली.

## खाकीतील माणुसकीचा गारवा!

रोखठोक — किशोर शिंपी, कार्यकारी संपादक

जळगाव जिल्हा म्हणजे उन्हाचा कहर! दरवर्षी तापमानाचे नवे विक्रम करणारा हा जिल्हा मे महिन्यात अक्षरशः भाजून निघतो. वातानुकूलित कार्यालयात बसणाऱ्यांना या उन्हाची झळ कदाचित जाणवत नसेल; पण रस्त्याच्या कडेला डोक्यावर आकाश घेऊन भाजीपाला, फळे विकणाऱ्या कष्टकरी विक्रेत्यांचे हाल मात्र शब्दात मांडता येणार नाहीत.

अशा वेळी जळगाव पोलिसांनी दाखवलेली संवेदनशीलता कौतुकास्पदच म्हणावी लागेल. शहरात भर उन्हात व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना पोलिसांकडून छत्री आणि थंड पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आल्या. हा उपक्रम आकाराने छोटा असला तरी माणुसकीच्या दृष्टिकोनातून खूप मोठा आहे.

आजच्या काळात पोलिसांविषयी समाजात अनेकदा नकारात्मक प्रतिमा रंगवली जाते. दंड, कारवाई, गुन्हे, वाद आणि तणाव यांच्या चौकटीतच खाकी वर्दीकडे पाहिले जाते. मात्र, या उपक्रमाने 'खाकीमध्येही हृदय धडधडते', हे पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

ज्यांच्या हातात कायद्याची काठी आहे, त्याच हातांनी गरिबांच्या डोक्यावर सावली धरली, ही बाब निश्चितच समाजासाठी सकारात्मक संदेश देणारी आहे. भरउन्हात तासन्‌तास बसणाऱ्या विक्रेत्यांना छत्री म्हणजे केवळ वस्तू नाही, तर दिलासा आहे. थंड पाण्याची बाटली म्हणजे केवळ पाणी नाही, तर जगण्याला मिळालेली उभारी आहे.

आज समाजात माणुसकी हरवत चालल्याची ओरड होत असताना जळगाव पोलिसांनी कृतीतून संवेदनशीलतेचा आदर्श घालून दिला आहे. असे उपक्रम केवळ प्रसिद्धीसाठी नसतात, तर समाज आणि प्रशासन यांच्यातील विश्वास दृढ करणारे असतात.

खरं तर प्रत्येक सरकारी विभागाने अशाच पद्धतीने समाजाशी नाळ जोडली, तर ''प्रशासन'' हा शब्द केवळ दप्तरापुरता न राहता लोकांच्या मनातही घर करेल. जळगाव पोलिसांचा हा उपक्रम म्हणजे उष्णतेत होरपळणाऱ्या कष्टकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने 'माणुसकीची सावली' ठरली आहे.

## थोडक्यात

### हतनूर धरणातून आवर्तन मंजूर; यावलकरांना ४० दिवस पाणीटंचाईची चिंता नाही

**यावल ।** यावल नगरपरिषदेकडून हतनूर धरणाच्या आवर्तनासाठी केलेली मागणी मंजूर झाली आहे. सोमवार, दि.११ मे रोजी धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे यावल नगरपरिषदेच्या साठवण तलावात पुढील ४० दिवस पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध होणार असल्याची माहिती नगराध्यक्षा छायाताई पाटील यांनी दिली. शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नसला तरी नागरिकांनी काटकसरीने पाणी वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, यावल नगरपरिषदेकडून जळगाव पाटबंधारे विभागाच्या उपकार्यकारी अभियंत्यांकडे यावल शहरासाठी राखीव असलेल्या पाणी आरक्षणातून हतनूर कालव्यातून आवर्तन सोडण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत उपकार्यकारी अभियंत्यांनी पाटबंधारे उपविभाग, सावदा येथील उपविभागीय अधिकाऱ्यांना उजव्या कालव्यातून पाणी प्रवाह सुरू करण्याबाबत लेखी सूचना दिल्या आहेत.

# महाराणा प्रतापसिंह जयंती उत्साहात; रोहित राजपुतांचा सत्कार

प्रतिनिधी । जळगाव

**हिंदवी स्वराज्याचे शूर योद्धे व मेवाडचे पराक्रमी राजा महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त कुशवाह राजपूत समाज बहुउद्देशीय संस्था, जळगाव यांच्या वतीने कांचन नगर समाज कार्यालय येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**



कार्यक्रमाची सुरुवात महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी त्यांच्या शौर्य, स्वाभिमान, राष्ट्रप्रेम तसेच मातृभूमीच्या रक्षणासाठी दिलेल्या योगदानाला अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमात समाजातील भरत गणसिंग राजपूत यांचे चिरंजीव रोहित भरत राजपूत यांची पालघर येथे पोलीस कॉन्स्टेबल पदासाठी निवड झाल्याबद्दल ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. समाजातील युवकांसाठी ही अभिमानाची बाब असल्याचे वक्त्यांनी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना रोहित राजपूत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि योग्य नियोजनामुळे यश मिळते, असे सांगितले. माझ्या यशामध्ये माझ्या वडिलांचा मोठा वाटा असून त्यांनी मला प्रत्येक टप्प्यावर सहकार्य केले, असे त्यांनी नमूद केले. समाजातील विद्यार्थ्यांना शक्य ती मदत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास कुशवाह राजपूत समाज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जगदीश सुभाष राजपुत , उपाध्यक्ष दीपक दगडु राजपूत यांच्यासह समाजबांधव, युवक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विरवाडे येथील विद्याभारती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे माध्यमिक शालांत परीक्षेत घवघवीत यश

प्रतिनिधी । चोपडा

तालुक्यातील विरवाडे येथील विद्याभारती माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी माध्यमिक शालांत परीक्षेत यंदाही यशाची परंपरा कायम राखत विद्यालयाचा निकाल ८०.३२% टक्के लागला आहे.विद्यालयाचे एकूण ६१ पैकी ५१ उत्तीर्ण झालेत.

दोन विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून विद्यालयातून कु.देवयानी ज्ञानेश्वर सोनगिरे हिने ९२.२०% गुण मिळवत प्रथम क्रमांकावर बाजी मारली आहे. तर पुनम अंबादास पाटील हिने ९१.२०%गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तसेच जयेश रवींद्र कोळी याने (८५%) तृतीय क्रमांक व मोहित रामदास सपकाळे याने(८४.२०%)चतुर्थ क्रमांक आणि मनीष जयपाल पवार याने (८०.२०%) पाचवा क्रमांकावर स्थान मिळविले आहे. यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे विद्याभारती बहुउद्देशीय शिक्षण मंडळाचे विद्यमान अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव, सर्व संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.



# चोपडा म्युनिसिपल हायस्कूलमध्ये दहावीच्या परीक्षेत राजू सोनवणे प्रथम तर साहिल बारेला द्वितीय

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा शहरातील पीएमसी सावित्रीबाई फुले माध्यमिक हायस्कूलच्या इयत्ता दहावीचा निकाल ८३.८७ टक्के लागला आहे . विद्यालयातून राज सुरेश सोनवणे याने शेकडा ८१.८०% गुण मिळत विद्यालयातून प्रथम येण्याच्या मान मिळवला आहे.**



फेब्रुवारी–मार्च २०२४ मध्ये झालेल्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले असून विद्यालयातून चिरंजीव साहिल दिलीप बारेला याने शेकडा ८०.२०% गुण मिळत द्वितीय क्रमांक पटकावला. तर समीर आबा पावरा याने १९०.८०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन नगराध्यक्ष नम्रता पाटील,उपनगराध्यक्ष पंकज बोरोले, शिक्षण सभापती अमोल पाटील, मुख्याधिकारी रामनिवास झंवर, उपमुख्य कार्य अधिकारी संजय मिसर, मुख्याध्यापक दीपक पवार व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# अनवर्दे–बुधगाव येथे दहावीच्या परीक्षेत प्राची सैंदाणे प्रथम तर स्वप्नील शिरसाठ द्वितीय

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अनवर्दे बुधगाव येथील ग्रामविकास शिक्षण मंडळ संचलित पंडितराव त्र्यंबकराव साळुंखे विद्यालयाचा दहावी फेब्रुवारी २०२६ निकाल ७५टक्के लागला. ५ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. प्राची दीपक सैंदाणे ८४.८०टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.**

यंदा १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झाले असून ८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत पास झालेले आहेत.द्वितीय क्रमांकावर स्वप्निल ईश्वर शिरसाठ याने ८२.८०टक्के गुण मिळवत बाजी मारली असून तृतीय क्रमांकावर कु. पूजा विकास बहारे ७६.८०टक्के गुण प्राप्त करून स्थान मिळविले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन प्रविण साळुंखे, व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर जगन्नाथ बोरसे, मुख्याध्यापक बळवंत सोनवणे,वर्गशिक्षक भुपेश धनगर सह शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी बंधू, भगिनी, पालकांनी अभिनंदन करून कौतुक केले.



# नूतन ज्ञान मंदिराची विद्यार्थिनी निकिता कुंभार दहावीत प्रथम

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अडावद येथील नूतन ज्ञान मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या एसएससी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत नूतन ज्ञान मंदिर विद्यालयाने आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.**

विद्यालयातून सेमी माध्यमचा निकाल १०० टक्के लागला आहे. मराठी माध्यमचा निकाल ८० टक्के एवढा लागला आहे. एकत्रित विद्यालयाचा निकाल शेकडा ८० टक्के एवढा लागला आहे. सेमी माध्यम मधून चिरायू रमाकांत पाटील ८५.६० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम आला आहे. तर द्वितीय क्रमांक दामिनी प्रवीण पवार व दिव्या वसंत पाटील या दोन्ही विद्यार्थिनींना ८४.२० एवढे गुण प्राप्त झाले आहेत. विद्यालयातून तृतीय क्रमांक भारती सुरेश प्रजापती या विद्यार्थिनीने प्राप्त केला आहे. या विद्यार्थिनीला ८३.४० एवढे गुण मिळाले आहेत. तर मराठी माध्यमातून निकिता रवींद्र कुंभार ही विद्यार्थिनी प्रथम आली आहे. या विद्यार्थिनीला ७७.४० टक्के गुण मिळाले आहेत. विद्यालयातून मराठी माध्यमातून द्वितीय क्रमांक दिशा भारत साळुंखे ७४.८० टक्के गुण मिळाले आहेत. तर विद्यालयातून मराठी माध्यमातून तृतीय क्रमांक प्रीती जय श्रीकृष्ण साळुंके ७३.६० टक्के गुण मिळाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक ,बंधू – भगिनींचे संस्थेचे चेअरमन डॉ के.पी. थेपडे संस्थेच्या सचिव सुषमाताई थेपडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.के.साळुंखे , उपमुख्याध्यापक के आर कणखरे सर, ज्येष्ठ शिक्षक श्री बी पी महाजन सर, श्री व्ही एल राठी सर यांनी अभिनंदन केले. तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनी यांनी देखील अभिनंदन केले.



# चोपड्यात राष्ट्रीय लोकअदालतीत ७७ प्रकरणे निकाली; साडेसतरा लाखांची वसुली

## •दाखलपूर्व १८६१ प्रकरणांपैकी ६ प्रकरणे निकाली; दिवाणी, फौजदारी ९०० पैकी ७७ प्रकरणे निकाली

प्रतिनिधी । चोपडा

**उच्च न्यायालय मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगाव यांच्या आदेशान्वये दि.९ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यात दिवाणी व फौजदारी प्रलंबित ९०० प्रकरणापैकी ७७ तर दाखलपूर्व प्रकरणे बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, बीएसएनएल, महसूल व म.रा.वि. मंडळाच्या दाखलपूर्व १८६१ प्रकरणापैकी ६ प्रकरणे निकाली झाले तर एकूण १७ लाख ५५ हजार ८३१रुपयांची वसुली झाली आहे**



सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोक अदालतला सुरुवात झाली. यावेळी पॅनलवर दिवाणी न्यायाधीश एस. डब्ल्यू. शेगोकार यांच्या सह पंच म्हणून ॲड. एच. एम. सय्यद व चोपडा वकील संघाचे सदस्य व सरकारी अभियोक्ता नितीन माळी , चोपडा तहसीलदार भाऊसाहेब थोरात तसेच नायब तहसीलदार योगेश पाटील , ग्रामविस्तार अधिकारी जे. पी.पाटील हजर होते. चोपडा न्यायालयातील दिवाणी व फौजदारी प्रलंबित ९०० प्रकरणे ठेवण्यात आले होते. त्यातून फौजदारीचे ४१ प्रकरणे, धनादेश अनादर ०९ प्रकरणे, दिवाणी २७ प्रकरणे अशी एकूण ७७ प्रकरणें निकाली काढण्यात आले. यात १२ लाख २९ हजार ८३१ रुपये वसुली झाली. बँक,मराविम व बी एस एन एल दाखल पूर्व प्रकरणे यांची एकूण १८६१ प्रकरणातून ६ प्रकरणे निकाली काढले. यात ५ लाख २६ हजार रुपये वसूल करण्यात आले. अशी एकूण १७ लाख ५५ हजार ८३१ रुपये वसूल करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी बार असोसिएशनचे वकील सदस्य, पोलिस कर्मचारी, सहाय्यक अधीक्षक, न्यायालयीन कर्मचारी, बँकेचे शाखा अधिकारी व म. रा.वि .मंडळ व बी.एस. एन. एल.चे अधिकारी यांचे सहकार्य लाभले. पॅनल प्रमुख यांनी कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

# कलाली गावात घरफोडी; दागिन्यांसह ४० हजारांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी । अमळनेर

तालुक्यातील कलाली येथे पहाटे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. सदरची घटना ८ मे रोजी घडली. तेजस गुलाब पाटील यांनी फिर्याद दिली आहे की, ८ मे रोजी रात्री घरातील सर्व सदस्य गच्चीवर झोपले होते. पहाटे ४ वाजेच्या सुमारास फिर्यादीची आई उठल्यानंतर घराचा कडी–कोयंडा तुटलेला असल्याचे तिच्या निदर्शनास आले. त्यानंतर कुटुंबीयांनी घरात जाऊन पाहणी केली असता घरातील कपाटच गायब असल्याचे लक्षात आले. कपाटाचा शोध घेतला असता ते फिर्यादीच्या काकांच्या घराजवळ बाहेर आढळून आले. कपाटातील सोन्याच्या २ ग्रॅम वजनाच्या रिंगा, ६ भार वजनाचे चांदीचे जोड बेले, ४ भार वजनाचे चांदीचे ब्रेसलेट, ५ भार वजनाच्या चांदीच्या लक्ष्मी तसेच ४० हजार रुपये रोख असा एकूण ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे उघड झाले. या प्रकरणी मारवड पोलिस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेडकॉन्स्टेबल संजय पाटील करीत आहेत.